UNDER THE AEGIS OF

MIT-SOG MIT School of Government
Since 2005
Bharat's First School to Create Future Political Leaders

SUPPORTED BY

Union Ministry of Youth Affairs & Sports, Govt. of India
Ministry of Higher & Technical Education, Govt. of Maharashtra
Ministry of Sports & Youth Welfare Govt. of Maharashtra
सत्यमेव जयते

राष्ट्रीय सरपंच संसद
सशक्त ग्राम, राष्ट्र की पहचान





# 1st महाराष्ट्र युवा संसद

2026 | 2 DAYS

## MAHARASHTRA YOUTH PARLIAMENT

**DEMOCRACY | LEADERSHIP | GOVERNANCE**

**दिनांक: 02 व 03 मे 2026**

**स्थळ: विश्वधर्मी मानवता तीर्थ, रामेश्वर, लातूर**

SUPPORTED BY

भारतीय छात्र संसद

unesco Chair

**धोरणनिर्मितीत युवकांची भूमिका:**
**महाराष्ट्रातील संसाधने, संस्कृती आणि शाश्वत विकास**

maharashtrayuvasansad.org | mitsog.org

# संकल्पना


महाराष्ट्राचा विकास प्रवास एकीकडे उल्लेखनीय प्रगतीचा आहे, तर दुसरीकडे प्रादेशिक वैविध्य आणि तफावतींनीही भरलेला आहे. भारतातील सर्वाधिक गतिशील राज्यांपैकी एक म्हणून महाराष्ट्राने उद्योग, शिक्षण आणि शहरी विकासाच्या क्षेत्रात आपली मजबूत ओळख निर्माण केली आहे; मात्र या प्रगतीचे फायदे राज्यातील सर्व भागांपर्यंत समान पद्धतीने पोहोचलेले नाहीत. त्यामुळे जिल्हानिहाय, तसेच ग्रामीण आणि शहरी भागांमध्ये विकासातील विषमता स्पष्टपणे दिसून येते. म्हणूनच, ही तफावत केवळ ओळखून थांबणे पुरेसे नाही, तर उपलब्ध संसाधनांचा योग्य वापर करून अधिक संतुलित आणि सर्वसमावेशक विकास घडवणे ही आजची गरज आहे.

या संदर्भात नीती आयोग, केंद्रीय भूजल मंडळ आणि महाराष्ट्र शासन यांच्या अहवालांमधून या वास्तवाचे विविध पैलू समोर येतात. विशेषतः मराठवाड्यातील लातूरसारख्या जिल्ह्यांना पाणीटंचाई, हवामानातील अनिश्चितता आणि शेतीवरील वाढता ताण यांसारख्या अडचणींचा सामना करावा लागतो. तरीही, या कठीण परिस्थितीतही या भागांनी जिद्द आणि नवकल्पनांची उदाहरणे निर्माण केली आहेत. समुदायाच्या सहभागातून राबवलेले जलसंवर्धन आणि जलसंधारण उपक्रम, स्वयं-सहायता गटांची भूमिका, तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रयत्न यांमुळे सकारात्मक बदल घडताना दिसतो. संकटांमध्येही संधी शोधण्याची क्षमता या प्रदेशात स्पष्टपणे जाणवते.

राज्याच्या विकासाच्या प्रक्रियेत ग्रामीण आणि शहरी भागांमधील सीमा हळूहळू कमी होत चालल्या आहेत. वाढती शहरे, उपनगरी क्षेत्रांचा विस्तार आणि नवीन आर्थिक मार्ग (corridors) यांमुळे विकासाच्या संधी आणि अपेक्षा बदलत आहेत. या बदलांमुळे पायाभूत सुविधांवर ताण आणि सेवांमध्ये असमानता निर्माण होत असली, तरी त्याचबरोबर रोजगार, उद्योजकता आणि नवोपक्रमासाठी नवीन संधी देखील उपलब्ध होत आहेत. म्हणूनच, या बदलांना समजून घेण्यासाठी आणि योग्य प्रतिसाद देण्यासाठी पारंपरिक "ग्रामीण-शहरी" भेदांच्या पलीकडे जाऊन एकात्मिक आणि परिस्थितीनुसार बदलणारा दृष्टिकोन स्वीकारणे आवश्यक आहे.

या संपूर्ण प्रक्रियेत युवक हे बदलाचे महत्त्वाचे घटक म्हणून पुढे येतात. शिक्षण, डिजिटल साधने आणि सोशल नेटवर्क्स यांच्या मदतीने युवक धोरणे आणि तळागाळातील वास्तव यांना जोडू शकतात. मात्र, यासाठी त्यांना योग्य दिशा आणि सक्षम व्यासपीठांची गरज असते. डॉ. राहुल वि. कराड यांच्या पुढाकारातून उभ्या राहिलेल्या एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंटच्या 'भारतीय विद्यार्थी संसद' आणि 'राष्ट्रीय सरपंच संसद' या उपक्रमांनी युवक आणि ग्रामीण नेतृत्वाला लोकशाही प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी प्रभावी मंच उपलब्ध करून दिला आहे. भारतीय छात्र संसद (BCS) मागील १६ वर्षांपासून लोकशाही, शासन आणि नेतृत्व या विषयांवर युवकांमध्ये सातत्याने जनजागृती व संवेदनशीलता निर्माण करण्याचे कार्य करत आहे. या उपक्रमांमुळे नव्या पिढीतील नेतृत्वामध्ये विचारांची परिपक्वता आणि निर्णयक्षमता विकसित होण्यास मोठी चालना मिळाली आहे.

याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र युवा संसद २०२६ हा एक महत्त्वाचा टप्पा ठरत आहे. जो विविध अनुभव, तथ्ये आणि युवकांचे दृष्टिकोन एकत्र आणण्याचा प्रयत्न करत आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून राज्यातील विविध भागांतील आव्हाने आणि संधी यांचा समतोल साधत अर्थपूर्ण चर्चा घडवून आणली जाईल. त्यामुळे युवक हे केवळ श्रोते किंवा लाभार्थी न राहता, अधिक न्याय्य, संतुलित आणि सशक्त महाराष्ट्र घडविणारे सक्रिय सहनिर्माते बनतील, आणि अशा लोकशाही उपक्रमांना अधिक व्यापक स्वरूप मिळेल.





**सत्र १: ग्रामीण महाराष्ट्र:**
**धोरणांची अपयश की व्यवस्थेचा दोष?**



**सत्र २: शहरी महाराष्ट्र:**
**प्रगतीचा आभास की विषमतेची वास्तवता?**



**सत्र ३: लातूर पुनरावलोकन:**
**शाश्वत विकासासाठी एक तुलनात्मक चिंतन**



**सत्र ४: स्थित्यंतर की क्रांती? :**
**युवक केवळ भागीदार नाही तर**
**तोच बदलाचा केंद्रबिंदू**




**सत्र ५: वेगवान व प्रगतीशील शासन आणि**
**प्रशासनासाठी AI चा वापर:**
**नागरिक म्हणून आपण किती सज्ज?**

## परिषदेची उद्दिष्टे



1. महाराष्ट्रातील अंतर्गत प्रादेशिक विषमता - जिल्ह्यांतील, विभागांतील तसेच ग्रामीण–शहरी पातळीवरील असमतोल, या संदर्भात युवकांना लोकशाही संवादात सक्रियपणे सहभागी करून घेणे.
2. विविध प्रदेशांतील विकासातील तफावतांचा चिकित्सक आढावा घेणे, विशेषतः संसाधने, पायाभूत सुविधा, उपजीविका आणि प्रशासन यांमधील असमानतेवर प्रवेशावर लक्ष केंद्रित करणे.
3. युवकांना धोरणनिर्मितीत योगदान देणारे आणि परिवर्तन घडविणारे घटक म्हणून सक्षम करणे, जेणेकरून ते सर्वसमावेशक, प्रदेश-संवेदनशील आणि संतुलित विकासासाठी कृतीयोग्य मार्ग सुचवू शकतील.

## प्रस्तावित कार्यक्रम

| दिवस १: अंतर्गत प्रादेशिक वास्तवांचे आकलन | |
|---|---|
| 10:00am to 11:00am | **नोंदणी:** • सहभागींची नोंदणी व स्वागत • सहभागींचे नेटवर्किंग व संवाद |
| **उद्घाटन सत्र (Inaugural Session)**<br>11:00 am to 01:00pm | • **स्वागतपर भाषण**<br>• प्रास्ताविक व परिषद परिचय<br>• प्रारंभिक उद्गार: सामाजिक असमानता; लोकशाही आणि युवकांची भूमिका<br>• प्रमुख व्याख्यान: महाराष्ट्रातील अंतर्गत प्रादेशिक विषमता – पुढील दिशा |
| 01:00 to 2:30pm | **दुपारचे जेवण** |
| **सत्र १:**<br>**ग्रामीण महाराष्ट्र: धोरणांची अपयश की व्यवस्थेचा दोष?**<br>02:30pm to 04:00pm | **केंद्रबिंदू:**<br>• एकाच प्रदेशातील विविध गावांतील विकासातील फरक<br>• मूलभूत सेवांपर्यंत पोहोच (आरोग्य, शिक्षण, पाणी)<br>• सामाजिक विषमता (जात, लिंग, जमीन मालकी)<br>• पंचायती राज संस्थांच्या कार्यक्षमतेतील फरक |
| 04:00 to 04:30pm | **नेटवर्किंग विश्रांती** |
| **सत्र २:**<br>**शहरी महाराष्ट्र: प्रगतीचा आभास की विषमतेची वास्तवता?**<br>04:30 to 06:00pm | **केंद्रबिंदू:**<br>• टियर-२ आणि टियर-३ शहरांमधील विकासातील तफावत<br>• अनौपचारिक वसाहती विरुद्ध नियोजित शहरी क्षेत्रे<br>• पायाभूत सुविधांतील असमानता आणि सेवा पुरवठ्यातील तफावत<br>• स्थलांतराचा ताण आणि शहरी वंचितता<br>• धोरण रचना आणि प्रत्यक्ष परिणाम यांतील दरी कमी करणे |
| 06:00 to 06:15pm | **नेटवर्किंग विश्रांती** |
| 06:15 to 07:30pm | **सांस्कृतिक कार्यक्रम** |
| 07:30 to 08:30pm | **रात्रीचे जेवण \| पहिल्या दिवसाचा समारोप** |

## दिवस २: महाराष्ट्रातील धोरणांची रूपरेषा – अंतर आणि शक्यता

| | |
|---|---|
| **सत्र ३:**<br>**लातूर पुनरावलोकन: शाश्वत विकासासाठी एक तुलनात्मक चिंतन**<br>**08:30am to 10:00am** | **केंद्रबिंदू:**<br>• लातूर - पश्चिम महाराष्ट्र यांच्या विकासात दरी का?<br>• हवामान अनिश्चिततेतून स्थैर्याकडे वाटचाल.<br>• कृषी-आर्थिक परिवर्तन व ग्रामीण समृद्धी<br>• पायाभूत सुविधा, उद्योग व गुंतवणूक वाढ<br>• युवा सक्षमीकरण, कौशल्य विकास व रोजगार संधी |
| **10:00am to 10:30 am** | **नेटवर्किंग विश्रांती** |
| **सत्र ४:**<br>**स्थित्यंतर की क्रांती? : युवक केवळ भागीदार नाही तर तोच बदलाचा केंद्रबिंदू**<br>**10:30am to 12noon** | **केंद्रबिंदू:**<br>• शासन आणि निर्णय प्रक्रियेत युवकांचा सहभाग<br>• ग्रामीण उद्योजकता आणि स्टार्ट-अप परिसंस्था<br>• डिजिटल साधने, नागरिक सहभाग आणि जागरूकता<br>• महाराष्ट्रातील युवकांनी पुढाकार घेतलेल्या उपक्रमांची उदाहरणे |
| **12noon to 1:30pm** | **दुपारचे जेवण** |
| **सत्र ५:**<br>**वेगवान व प्रगतीशील शासन आणि प्रशासनासाठी AI चा वापर: नागरिक म्हणून आपण किती सज्ज?**<br>**01:30pm to 3:00pm** | **केंद्रबिंदू:**<br>• ग्रामीण–शहरी धोरणांमधील तफावत<br>• प्रदेश-विशिष्ट नियोजन दृष्टिकोनाची गरज<br>• विकेंद्रीकरण आणि स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिका<br>• सर्वसमावेशक धोरणनिर्मिती आणि अंमलबजावणीत युवकांचा सहभाग |
| **समारोप सत्र (Valedictory Session)**<br>**03:00pm to 05:00pm** | • "संतुलित विकासासाठी महाराष्ट्र युवा संसद जाहीरनामा" सादरीकरण<br>• अंतर्गत प्रादेशिक विषमता कमी करण्यासाठी युवकांच्या शिफारसी<br>• समारोपपर भाषण: समतोल आणि सर्वसमावेशक महाराष्ट्राकडे वाटचाल<br>• आभार प्रदर्शन |
| | **परिषद समापन** |


**अधिक महितीसाठी संपर्क करा :**

**डॉ. ज्ञानेश्वर दिघोळे**
८००७०२९१७७

**डॉ. विजू तोरड**
९९७०१३९३७२

**बळीराम एस.हांडगे**
९८८१०९०२००

**परमेश्वर सोनवणे**
९५२७२५०९४५


Register Now

maharashtrayuvasansad.org | mitsog.org